स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

**संदर्भ : रासेयो/२०२३–२४/६८३** **दि. २०/०२/२०२४**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक**
**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**
**फक्त पुणे शहर**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : आरोग्य चित्रपट महोत्सवामध्ये युवक व युवतींच्या सहभागाबाबत...**

महोदय/महोदया,

पी.एम. शहा फाऊंडेशन ही संस्था आरोग्य व मानवी विकास याकरिता कार्यरत असून या संस्थेमार्फत सर्व समाजातील वंचित घटकांसाठी अरोग्य शिबिरे, मार्गदर्शनपर मेळावे, आरोग्य विषयक लोकशिक्षण, समाजाभिमुख कार्यक्रम तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याच्या समस्यांविषयी जनजागृती करण्यात येत आहे. मागील १२ वर्षांपासून सदर संस्था पुणे शहरात आरोग्य चित्रपट महोत्सवासारखा आगळा वेगळा उपक्रम सर्वसामान्य नागरिकांसाठी यशस्वीरित्या राबवत आहे.

यावेळेस संस्थेने सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याला केंद्रबिंदू मानून दि. २३ व २४ फेब्रुवारी, २०२४ रोजी राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय **(National Film Archives of Indian)** लॉ कॉलेज रोड, पुणे येथे १२वा आरोग्य चित्रपट महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. सदरच्या चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन हे दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ रोजी दु. २ ते ३ या वेळेत होणार आहे. यामध्ये राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजलेले आरोग्यविषयक लघुपट/माहितीपट दाखविण्यात येणार आहे. दिनांक २४ फेब्रुवारी, २०२४ रोजी सकाळी १० ते सायं. ४.३० या वेळेत यावर्षी आरोग्य चित्रपट महोत्सवामध्ये घेण्यात आलेल्या स्पर्धेमधील सहभागींचे उर्वरीत लघुपट व माहितीपट दाखविले जाणार असून सायंकाळी ४.३० ते ५.३० या वेळेत पुरस्कार वितरण समारंभ व कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त युवक व युवतींना सदर महोत्सवामध्ये सहभागी होण्याकरिता पाठविण्यात यावे ही विनंती. सदरचा आरोग्य चित्रपट महोत्सव हा सर्वांसाठी खुला व विनामूल्य आहे. कळावे, ही विनंती.

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**